**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०८/१०/२०२६

*सेवा संकल्प अभियानांतर्गत महानगरपालिकेमार्फत दि.१० ऑक्टोबर रोजी किनारपट्टी स्वच्छता मोहीमेचे आयोजन*

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत असून, या अभियानांतर्गत विविध उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या अनुषंगाने स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत विविध स्वच्छता मोहिमाही आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत शनिवार *दि.१० ऑक्टोबर २०२६* रोजी *सकाळी ०६.३०* वाजता *राजोडी समुद्रकिनारा (Rajodi Beach), विरार (प.)* येथे विशेष *किनारपट्टी स्वच्छता मोहीम* (Beach Cleanup Drive) राबविण्यात येणार आहे.

या स्वच्छता मोहिमेत महानगरपालिकेचे पदाधिकारी, स्थानिक पदाधिकारी, स्थानिक समुदाय, अशासकीय संस्था, समुद्रकिनारी वापरकर्ते, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, स्काउट्स विद्यार्थी, खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील प्रादेशिक अधिकारी, महिला बचतगट, पर्यटक, नागरिक, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी या मोहिमेत सहभागी होणार आहेत.
समुद्रकिनाऱ्यावर जमा होणारा प्लास्टिक कचरा, थर्माकोल, काच, कागद तसेच इतर घनकचरा यांचे संकलन करून किनारपट्टी स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा प्रयत्न या मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नागरिकांना समुद्रकिनारी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा कमीतकमी वापर करणे आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, घनकचरा व्यवस्थापनास चालना देणे तसेच सामुहिक सहभागातून स्वच्छता विषयक जनजागृती या मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय आणि विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांनी तसेच नागरिकांनी या समुद्रकिनारा स्वच्छता मोहिमेत एकत्रितपणे सहभागी होऊन समुद्रकिनारा स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.